# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्रमांक :- १३७/२०२५ दिनांक :- २६/०३/२०२५.

## अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर या नवीन कार्यालयाचे उद्घाटन कार्यक्रम संपन्न.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे गुन्हे शाखा अंतर्गत, अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर हे कार्यालय यापुर्वी मॅक्सेस मॉल जवळ भाईंदर पश्चिम येथे मॅट्रो लाईन क्रमांक ०९ चे पोल क्रमांक पी-२५६ व पी-२५७ यामध्ये मेट्रोच्या कामामध्ये कार्यालयाची जुनी इमारत तोडल्यामुळे कार्यालयाचे कामा तात्पुरत्या स्वरुपात कंटेनरमध्ये चालु होते. परंतु रोड कॉक्रिटीकरण व मेट्रो लाईनचे कामामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने कार्यालय स्थलांतरीत करणे आवश्यक होते.

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे १०० दिवसीय कृती आराखड्याचे धोरणानुसार अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर हे कार्यालय काशिगाव पोलीस ठाणे, दुसरा माळा, विनय नगर, मिरारोड (पुर्व), ता.जि. ठाणे येथे स्थलांतरीत केले आहे. सदर कार्यालयाचे नवीन इमारतीचे उद्घाटन कार्यक्रम मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, यांचे शुभहस्ते व मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त गुन्हे यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच मा. सहायक पोलीस आयुक्त गुन्हे, मा. पोलीस निरीक्षक, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर, पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे आयोजनात दिनांक २६/०३/२०२५ रोजी संपन्न झालेला आहे.

नवीन कार्यालयाचा उद्घाटन कार्यक्रम यशस्वी होणेसाठी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनात, पोनि/देविदास हंडोरे, पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे, उमेश पाटील, अनिल पवार, सफौ/राजु भोईर, रामचंद्र पाटील, राजाराम आसावले, शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, सम्राट गावडे, चेतनसिंग राजपुत, केशव शिंदे, मपोहवा/निशीगंधा मांजरेकर, अश्विनी भिलारे, मपोशि/तृषा कटकधोंड यांनी परिश्रम घेतले.

जुने कार्यालय ठिकाण :- मॅक्सेस मॉल जवळ भाईंदर पश्चिम



नवीन कार्यालय ठिकाण :- काशिगाव पोलीस ठाणे, दुसरा माळा, विनय नगर, मिरारोड (पुर्व)




Shot on OnePlus


Shot on OnePlus